# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

<u>**प्रसिद्धी पत्रक                                        ता. २४ नोव्हेंबर २०१९**</u>

# मनपातर्फे कर्मवीर कन्नमवार यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**नागपूर, ता. २४ :** राज्याचे माजी मुख्यमंत्री कर्मवीर मा.सां. उपाख्य दादासाहेब कन्नमवार यांच्या पुण्यतिथीनिमित्त नागपूर महानगरपालिकेच्या वतीने विधानभवन परिसरातील पुतळ्याला आणि प्रतिमेला धरमपेठ झोन सभापती अमर बागडे यांनी माल्यार्पण करून अभिवादन केले.

यावेळी बेलदार समाजाचे अध्यक्ष राजेंद्र बढिये, मुकुंद अडेवार, खिमेश बढिये, विनोद आकुलवार, अरविंद बोम्रतवार, हरिश चौरे, संजय माटे, मिलिंद वानखेडे, ना. मा. जाधव, कविता बढिये, रजनी बढिये, प्रकाश कांचनवार, मनपाचे सहायक जनसंपर्क अधिकारी प्रदीप खर्डेनवीस उपस्थित होते.